③ I.O.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** लातूर **P.S.(ठाणे):** निलंगा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0002 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/01/2026 21:40

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 01/01/2026
   **Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 01/01/2026
   **Time From (वेळेपासून):** 13:05 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 13:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/01/2026 **Time (वेळ):** 21:20 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 027

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/01/2026 21:20 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** शासकीयविश्रामगह,निलंगाचेबाजुस , खाजगीतलाठीकार्यालयदत्त नगरनिलं,निलंगा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): DYSP संतोश धनसिंग बर्गे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1976

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,लातूर,लातूर,शिवाजी नगर,लातूर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,लातूर,लातूर,शिवाजी नगर,लातूर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7744812535

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | कमलाकर विठ्ठलराव मुंडे | | | 1. गुंजरगा,निलंगा ,औराद शहाजानी,लातूर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2500 रूपये रोख रक्कम | 2,500.00 |



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

2,500.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

आज रोजी आम्ही ASI/गायकवाड पोलीस ठाणे अंमलदार म्हणुन डयूटीस हजर असताना यातील फिर्यादी यांनी एक टंकलिखीत केलेली फिर्याद समक्ष हजर केली त्यातील मजकुर खालील प्रमाणे

मी संतोश धनसिंग बर्गे वय 50 वर्श, व्यवसाय -नोकरी, पद -पोलीस उप अधीक्षक, नेमणुक - लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर, मो नंबर -7744812535

सरकार तर्फे फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर येथे 16 फेब्रुवारी 2024 पासून पोलीस उप अधीक्षक या पदावर कार्यरत आहे.

आम्ही दि.31/12/2025 रोजी कार्यालयात हजर असताना तक्रारदार श्री.जीवन मोहन सोळुंके यांनी मला फोनद्वारे एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणीची तक्रार असलेबाबत सांगितले. त्यावरून मी त्यांना दिनांक 01/01/2026 रोजी सकाळी 09.00 वाजता ला.प्र.वि.कार्यालय,लातूर येथे बोलावले त्यावरून मी सापळा कारवाई आयोजीत करण्याकरीता दोन षासकीय पंच आवष्यक असल्याने दिनांक 31/12/2025 उपमुख्यकार्यकारी अधिकारी,जि.प. लातूर यांचे नावे पत्र देवून त्यांच्या कार्यालयाकडील दोन कर्मचारी गोपनीय कारवाई करीता पंच म्हणून उपलब्ध करून घेतले.

आज दिनांक 01/01/2026 रोजी सापळा कारवाई आयोजीत केली. तक्रारदार जीवन सोळूंके हे ला.प्र.वि.लातूर येथे हजर आले. दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना सदरचे ईसम हे तक्रारदार असल्याचे सांगुन त्यास त्यांचे नाव व पत्ता विचारला असता तक्रारदार यांनी त्यांचे नाव श्री.जीवन मोहन सोळंुके वय 38 वर्शे व्यवसाय षेती/मजूरी रा. सोनखेड पो. सावरी ता. निलंगा, जि.लातूर असे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांची तोंडी तक्रार सांगितली सदरची तक्रार पोकॉ/1759 कोंडरे यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथील लॅपटॉपवर टंकलिखीत केली ती पुढील प्रमाणे आहे. " मी वरील ठिकाणचा राहणारा असुन मोलमजूरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. माझी आई श्रीमती विमलबाई मोहन सोळंुके रा. सोनखड ता.निलंगा जि. लातूर हिचे नावाने श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना व इतर षासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज सादर करावयाचा आहे. त्याकरीता तिचे उत्पन्नाचा दाखला आवष्यक आहे. सदर उत्पन्नाचा दाखला प्राप्त करण्यासाठी मी गावचे तलाठी कमलाकर मुंडे यांना सुमारे एक महिन्यापुर्वी भेटलो असता त्यांनी मला सदर उत्पन्नाचे प्रमाणपत्र देण्यासाठी 5,000/- रूपये रक्कमेची मागणी केली आहे. माझे कामाकरीता कुठलीही षासकीय फी लागत नाही. त्यामुळे तलाठी मुंडे साहेब मागत असलेली रक्कम ही लाच असल्याची माझी खात्री झाली आहे. तलाठी मुंडे साहेब यांना लाच देण्याची माझी बिलकुल इच्छा नाही. परंतु मी त्यांना लाच दिली नाही तर ते माझे काम करणार नाहीत.या भितीपोटी मी त्यांना होकार देवून स्वमर्जीने तक्रार देण्यासाठी आलो आहे.

मी आज दिनांक 01/01/2026 रोजी तलाठी कार्यालयात जावून संबंधीत लोकसेवक मंुडे यांची भेट घेवून त्यांचेकडे माझे कामासंबंधी बोलणी करणार आहे. सदर भेटी दरम्यान संबंधीत ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) कमलाकर मुंडे साहेब यांनी माझे कामाकरीता स्वतः किंवा इतरांमार्फत लाचेची मागणी करून ती स्वतः किंवा इतरांमार्फत स्विकारल्यास त्यांचेवर कायदेषीर कार्यवाही करण्यात यावी. संबंधीत ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) कमलाकर मुंडे साहेब यांचेषी माझा कसलाही आर्थिक अगर पैषाच्या देवाण घेवाणीचा व्यवहार नसून त्यांचे व माझे कुठलेही वैर नाही.'' अषा आषयाची तक्रार दिली असुन सदर तक्रार टंकलिखीत केल्यानंतर त्याची प्रिंट काढून वाचुन पाहुन तक्रारदार, मी व दोन्ही पंचानी तक्रारीवर सहया केल्या आहेत.

आज दिनांक 01/01/2026 रोजी 10.00 वाजता आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक असे षासकीय वाहन क्रमांक डभ्.24.ठग्.4015 चे चालक पोह/210 क्षीरसागर यांचेसह सापळा कारवाईकरीता आवष्यक असलेल्या सर्व साहित्यासह ला.प्र.वि.कार्यालय लातूर येथून रवाना होवून औराद रोड, सीएनजी पंप,निलंगा येथे 11.00 वाजता पोहोचलो व आमचे वाहन रोडचे आडबाजूस लावले.



Scanned with OKEN Scanner

तक्रारदार श्री.जीवन मोहन सोळुंके यांचे वर नमुद कामासाठी ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) श्री कमलाकर मुंडे यांनी तक्रारदार यांना लाचेची मागणी केली आहे अगर कसे? याची पंचासमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले. तक्रारदार श्री.जीवन मोहन सोळुंके यांचे कामासंदर्भात व लाचेच्या मागणी संदर्भात तक्रारदार श्री.जीवन मोहन सोळुंके व ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) श्री कमलाकर मुंडे यांचेत काय बोलणी होते ते डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवुन मी दोन्ही पंच व तक्रारदार यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाबत सविस्तर माहिती देवुन त्यामध्ये नविन मेमरीकार्ड मी दोन्ही पंचासमक्ष फोडुन ते डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन त्यात पुर्वीचे कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रीत झाले नसले बाबत दोन्ही पंचाना खात्री करुन देण्यात आली.

लाच मागणी पडताळणी पुर्वी मी तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना सुचना दिल्यानंतर तक्रारदार सोळुंके यांनी वर नमुद प्रमाणे दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचेची मागणी पडताळणी करण्याचे ठरवुन व पो.अं./1759 कोंडरे यांचे मदतीने 11.26 वाजता डिजीटल व्हॉइस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार यांचे गळयात अडकावुन तक्रारदार यांना पंच क्रमांक 1 यादव यांच्या सोबत ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) श्री कमलाकर मुंडे यांची भेट घेण्यासाठी त्यांचे कार्यालयाकडे रवाना करून मी, पंच क्र. 02 गवळी व सापळा पथकातील ईतर सदस्य वाहनामध्ये थांबुन राहीलो.

त्यांनतर अंदाजे 12.06 वाजण्याच्या सुमारास तक्रारदार सोळुंके व पंच क्रमांक 1 यादव हे परत सापळा पथकाच्या वाहनाजवळ आले असता पो.अं.1759 कोंडरे यांचे मदतीने तक्रारदार यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद केले. मी, पंच क्रं. 1 यादव यांना ते तक्रारदार यांचे सोबत ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) श्री कमलाकर मुंडे यांची भेट झाल्यानंतर तक्रारदार यांचे कामासंदर्भात व लाचेच्या रक्कमे संदर्भात काय बोलणी झाली? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 यादव यांनी सांगितले की, "मी व तक्रारदार सोळुंके असे मिळुन तलाठी कार्यालयात गेलो असता, तक्रारदार यांनी कार्यालयात बसलेला पांढरा षर्ट व काळी पॅन्ट घातलेला ईसमाकडे इशारा करुन सदर इसम हा ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) श्री कमलाकर मुंडे असल्याचे सांगीतले. तक्रारदार यांनी त्यांचे कामासंदर्भात चर्चा केली असता, तक्रारदार सोळुंके म्हणाले.... राम राम ओ... साहेब... तेवढे उत्पन्न आईचं... त्यावर तलाठी मुंडे म्हणाले.... तेवढे करा.... त्यावर तक्रारदार सोळुंके म्हणाले सांगा मग त्यच्यामधी ... काय.... त्यावर तलाठी मुंडे म्हणाले.... हं.. आता काय बोललणं... आता अजून काय?.... काय सांगायचयं .... त्यादिवषी सांगीतलं नाही का तुम्हाला....काय सांगायचयं लगेच देवून टाकायचं पटमन्या... त्यावर तक्रारदार सोळुंके म्हणाले.... येतो साहेब जाऊन मग.... त्यावर तलाठी मुंडे म्हणाले.... कुठून येताव? आता नवीन वर्शाचं आता असचं जाणार हावं का? नवीन दिवसाचं आसचं जाणाराव का?.. त्यावर तक्रारदार सोळुंके म्हणाले... रिस्पॉन्स कायबी देईनाव की...... म्हणून जावून येतो म्हणलं... त्यावर तलाठी मुंडे म्हणाले.... तुचं तुमच्या हिषोबानं द्या... मी काय तुम्हाला एवढंच तेवढंच मनना.... असे म्हणून सापळा पथकाच्या वाहनाजवळ परत आलो." अषी हकीकत पंच क्रमांक 1 यादव यांनी सांगितली. मी, दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार यांना विचारणा केली असता तक्रारदार यांनी थोडया वेळापुर्वी पंच क्रमांक 1 यादव यांनी सांगितलेल्या हकीकतीषी मिळती जुळती हकीकत सांगितली. त्यानंतर तक्रारदार जीवन सोळुंके व ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) कमलाकर मुंडे यांचे व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रीत झालेले संभाशण पो.अं. 1759 कोंडरे यांचे मदतीने चालू करून सर्वांनी ऐकले ते पंच क्रमांक 1 व तक्रारदार यांचे सांगणे प्रमाणे मिळते जुळते असल्याचे दिसून आले.

वरील झालेल्या संभाशणावरून ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) श्री कमलाकर मुंडे यांनी तकारदार यांना निष्चित किती लाच रक्कम द्यायची हे तक्रारदारास न सांगितल्याने तक्रारदार यांना तलाठी यांचेकडे लाच मागणी पडताळणीसाठी पुन्हा पाठविण्याचे ठरविण्यात आले.त्यानंतर पो.अं.1759 कोंडरे यांचे मदतीने 12.27 वाजता डिजीटल व्हॉइस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार यांचे गळयात अडकावुन तक्रारदार यांना पंच क्रमांक 1 यादव यांच्या सोबत ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) श्री कमलाकर मुंडे यांची भेट घेण्यासाठी खाजगी तलाठी कार्यालय येथे पुन्हा रवाना करून मी, पंच क्र. 02 गवळी व सापळा पथकातील ईतर सदस्य वाहनामध्ये थांबुन राहीलो.

त्यांनतर अंदाजे 12.52 वाजण्याच्या सुमारास तक्रारदार सोळुंके व पंच क्रमांक 1 यादव हे परत सापळा पथकाच्या वाहनाजवळ आले असता पो.अं.1759 कोंडरे यांचे मदतीने तक्रारदार यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद केले. मी, पंच क्रं. 1 यादव यांना ते तक्रारदार यांचे सोबत ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) श्री कमलाकर मुंडे यांची भेट झाल्यानंतर तक्रारदार यांचे कामासंदर्भात व लाचेच्या रक्कमे संदर्भात काय बोलणी झाली? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 यादव यांनी सांगितले की, "मी व तक्रारदार सोळुंके असे मिळुन खाजगी तलाठी कार्यालयात गेलो असता, तक्रारदार व तलाठी मुंडे यांचेमध्ये चर्चा केली असता, तक्रारदार सोळुंके म्हणाले.... मग साहेब ... बोलल्याप्रमाणं पाच हजार बोलल्याले होते... काय तर एक दोन हजार द्यावे म्हणलालतो....त्यावर तलाठी



Scanned with OKEN Scanner

मुंडे म्हणाले.... व्हय की मग... त्यावर तक्रारदार सोळुंके म्हणाले दोन हजार देतो म्हणलो.... त्यावर तलाठी मुंडे म्हणाले.... द्या... द्या... द्या.... काय द्यायचे द्या..... कषाला उगं नाहीतर काय... त्यावर तक्रारदार सोळुंके म्हणाले...ते तसे बोलल्याप्रमाणं तुम्ही आणि... त्यावर तलाठी मुंडे म्हणाले.... बघू मग द्या काहीतर अडीच द्या अडीच ... अडीच द्या... त्यावर तक्रारदार सोळुंके म्हणाले... घ्या ओ दोन हजार आणतो काय.... त्यावर तलाठी मुंडे म्हणाले... आणा...पटमन आणा... आणा जावा.... पटमन ... उग सकाळी सकाळी असलं हे करू नका... पटमन...अडीच हजार आणा... असे म्हणून सापळा पथकाच्या वाहनाजवळ परत आलो." अषी हकीकत पंच क्रमांक 1 यादव यांनी सांगितली. मी, दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार यांना विचारणा केली असता तक्रारदार यांनी थोड्या वेळापुर्वी पंच क्रमांक 1 यादव यांनी सांगितलेल्या हकीकतीषी मिळती जुळती हकीकत सांगितली. त्यानंतर तक्रारदार जीवन सोळुंके व ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) कमलाकर मुंडे यांचे व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रीत झालेले संभाशण पो.अं.1759 कोंडरे यांचे मदतीने चालू करून सर्वांनी ऐकले ते पंच क्रमांक 1 व तक्रारदार यांचे सांगणे प्रमाणे मिळते जुळते असल्याचे दिसून आले.

ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) श्री कमलाकर मुंडे यांनी मागणी केलेली 2500/- रुपये लाचेची रक्कम स्वीकारण्यास सहमती दर्षविल्याचे निश्पन्न झाले. त्यानंतर ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) श्री कमलाकर मुंडे यांनी मागणी केलेली 2500/- रुपये लाचेची रक्कम सर्वानुमते देण्याचे ठरविले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचेजवळील 2500/-रूपये हजर केले. आम्ही तक्रारदार व पंचाना अॅन्थ्रासीन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहिती व प्रात्यक्षीक करुन दाखविले. तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना पोकॉ/1256 गंभीरे यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावुन तक्रारदार यांच्या अंगातील षर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिष्यामध्ये ठेवुन लाचेची रक्कम दिल्यानंतर आपल्या गळ्यातील गमजा काढुन हातात धरणे बाबतचा सुनियोजीत ईषारा करणेबाबत सांगण्यात आला. त्यानंतर आम्ही, तक्रारदार दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना पुढील सापळा कार्यवाही बाबत पुन्हा सुचना दिल्या. त्यानंतर पोकॉ/1759 कोंडरे यांचे मार्फतीने 12.54 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटण चालु करुन तक्रारदार यांचे गळयात अडकावुन खाजगी तलाठी कार्यालयात जाण्यास सांगितले. आम्ही व सापळा पथक सदर कार्यालयाच्या आजुबाजुस कोणाच्या नजरेत येणार नाही असे अडबाजुस थांबुन राहिले. त्यानंतर तक्रारदार जीवन सोळुंके यांनी नियोजीत लाचस्विकृतीचा इषारा केला. आम्ही, पंच क्र. 02 गवळी व सापळा पथकातील सदस्यासह घटनास्थळी हजर आलो. पोकॉ/1759 कोंडरे यांनी तक्रारदार यांचे गळयातील व्हाईस रेकॉर्ड काढून घेवून 13.05 वाजण्याच्या सुमारास बंद केले. त्यावेळी आम्ही पंच क्रमांक 1 यादव यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 यादव यांनी समोर पांढ-या रंगाचा षर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट घातलेली व्यक्ती हे ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) श्री कमलाकर मुंडे असुन त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम उजव्या हाताने स्विकारुन अंगातील षर्टचे डाव्या बाजूचे खिष्यामध्ये ठेवल्याचे सांगितले. तसेच लाच मागणी पडताळणी दरम्यान लाच मागणी केलेले ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) श्री कमलाकर मुंडे हे तलाठी कार्यालयात असल्याचे सांगितले. त्यावरून आम्ही ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) श्री कमलाकर मुंडे यांना ताब्यात घेतले. आम्ही आमचे ओळखपत्र दाखवून त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव कमलाकर विठ्ठलराव मुंडे वय 52 वर्षे, व्यवसाय ग्राम महसूल अधिकारी (तलाठी), तलाठी सज्जा- गुंजरगा, तहसिल कार्यालय, निलंगा ता. निलंगा जि. लातूर असे असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही पंच क्रमांक 2 गवळी यांचे हस्ते ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) श्री कमलाकर मुंडे यांचे अंगातील पांढरे रंगाच्या षर्टच्या डाव्या खिष्यातील लाचेची रक्कम काढुन घेवुन पंच क्रमांक 1 यादव यांचे मार्फतीने सापळा कार्यवाही दरम्यान लिहुन घेण्यात आलेल्या नोटांचे वर्णन व नंबरषी पडताळून पाहीले असता ते एकच असल्याचे निदर्षनास आले. त्यानंतर ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) श्री कमलाकर मुंडे यांना ताब्यात घेवुन तेथील आवष्यक ती सापळा कार्यवाही करुन सदर ठिकाणी गर्दी होत असल्याने पुढील कार्यवाही करणेकरीता घटनास्थळावरुन रवाना होवून ला.प्र.वि कार्यालय, लातूर येथे येवुन पुढील कार्यवाही पुर्ण केली आहे.

तरी यातील आरोपी लोकसेवक कमलाकर विठ्ठलराव मुंडे वय 52 वर्शे, व्यवसाय ग्राम महसूल अधिकारी (तलाठी), तलाठी सज्जा- गुंजरगा, तहसिल कार्यालय, निलंगा ता. निलंगा जि. लातूर यांनी तक्रारदार यांची आई विमलबाई मोहन सोळुंके यांना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना व इतर षासकीय योजनेसाठी उत्पन्नाचा दाखला काढण्यासाठी दि.01/01/2026 रोजी 2,500/- रू. लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम लोकसेवक कमलाकर विठ्ठलराव मुंडे यांनी त्यांचे खाजगी तलाठी कार्यालयात सुमारे 13.05 वाजता पंचासमक्ष स्वतः स्विकारली आहे, म्हणुन माझी त्यांचेविरुध्द भ्रश्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 अन्वये सरकारतर्फे कायदेषीर फिर्याद आहे वगैरे फिर्याद वरून मा.पोनिसो यांचे आदेशाने गुन्हा दाखल करून पुढील तपासकामी पोनि/विशाल बहात्तरे, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,लातुर यांचेकडे देण्यात आला आहे.



Scanned with OKEN Scanner

उतारा रवाना :- 1)भा.अति.सत्र न्यायालय,निलंगा 2)स्थागुशा,लातुर 3)फिर्यादीस एक प्रत विनामुल्य

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Sudhir Daattatray Suryawanshi(I (Inspector)) / DGPSDSM8308

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अमलदार
पोलीस ठाणे निलंगा

पोलीस निरीक्षक
पोलीस स्टेशन, निलंगा

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Sudhir Daattatray Su

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): DGPSDSM8308



Scanned with OKEN Scanner